# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१०५०
०२०—२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.— साफुपुवि/अंगुसिक/३९४ दिनांक: १०/०१/२०२२

स्मरणपत्र

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानीत महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा व दादरा—नगर हवेली,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय — महाविद्यालयांनी मॅनेजमेंट इन्फॉरमेशन सिस्टिम (M.I.S.) सन २०२१—२२ ची माहिती नोंदणी करून पूर्ण भरणेबाबत.**

**संदर्भ** — १.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१—२२/१०५८९ दि. २७.०९.२०२१ चे शिक्षण संचलनालय, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे कार्यालयीन पत्र.
२. उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१—२२/१३७९० दि. २६.११.२०२१ चे शिक्षण संचलनालय, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे कार्यालयीन पत्र.
३. साफुपुवि/अंगुसिक/३८८ दि. ०४/०१/२०२२

महोदय/महोदया,

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी **सन २०२१—२२** या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्हयामधील आणि दादरा—नगर हवेली येथील **अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम** शिकवणा—या महाविद्यालयांकडून **ऑनलाइन पध्दतीने** विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात आली होती. परंतु महाविद्यालये/संस्थांनी वारंवार पत्रव्यवहार करूनही अद्यापपर्यंत माहिती भरलेली नाही. अशा महाविद्यालयांनी **दिनांक २२ जानेवारी २०२१** पर्यंत एम.आय. एस. ची माहिती तात्काळ भरून पूर्ण करावयाची आहे याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

तसेच,पुढे नमूद करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर विद्यापीठाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी/अनुदान प्राप्तीसाठी विद्यापीठाकडून ना—हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. नंतर महाविद्यालयांची कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून,महाविद्यालयांनी **एम.आय.एस. (M.I.S.)** सन २०२१—२२ **ची वेबपोर्टलवर** ऑनलाइन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये माहिती भरून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी मा. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०—२९७०७०९३, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०२०—२५६२१०४५/४८/४९/५१ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

(श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव